# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172


*No:- CGRF/AZ/AUR/ U / 267 / 2009 / 101 /* *Date :-*

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer ,
O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

*Sub:-* Forwarding of grievance in respect of Navjeevan Society for Research and Rehabilitation of Mentally Retarded P-65, Chikalthana, MIDC Area, Aurangabad.
(Consumer No.490012340661 )

*Dear Sir,*

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Forwarding of grievance in respect of Navjeevan Society for Research and Rehabilitation of Mentally Retarded P-65, Chikalthana, MIDC Area, Aurangabad.

You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 29.12.2009 at 11= 30 Hrs. onwards.

*Encl: As above*

*Member/Secretary*
*CGRF(AZ) MSEDCL*
*Aurangabad.*

Copy to:-

Navjeevan Society for Research and
Rehabilitation of Mentally Retarded ,
P-65, Chikalthana, MIDC Area,
Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२६७/२००९/१०१

तक्रार दाखल दिनांक :- १५/१२/२००९
निकाल दिनांक :- ११/०२/२०१०

**नवजीवन सोसायटी फॉर रिहॅबिलीटेशन,**
**ऑफ मेंटली रिटारडेड,**
**पी-६५,एम.आय.डी.सी. एरिया,**
**चिकलठाणा, नारेगांव रोड,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१२३४०६६१)** अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत
शहर विभाग औरंगाबाद.

गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | विष्णु अं. हंबिरे | अध्यक्ष |
| | प्रदीप. अ. सगणे | सदस्य/सचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १५/१२/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २९/१२/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) महावितरण कंपनीकडुन ग्राहकाने नवजीवन मंतीमंद मुलांचे वस्तीगृह नारेगांव रोड औरंगाबाद येथे दिनांक १२/०९/२००७ पासुन विद्युत पुरवठा घेतला आहे.महाविरतण कंपनीने ग्राहकास मीटर रिडींग प्रमाणे दिलेली वीज देयके त्यांनी वेळोवेळी भरलेली आहेत.माहे सप्टेबर २००९ मध्ये ग्राहकास अचानक ११९९१ युनिट वीज वापराचे रुपये ८८९९२.१९/- एवढे वीज देयक देण्यात आले. वरील अवास्तव वीज देयकाबाबत ग्राहकाने महावितरणचे संबंधित उपविभागाकडे संपर्क साधुन सुधारीत वीज बिल देण्याबाबत विनंती केली. परंतु त्यांचे वीज बिल दुरुस्त करण्यात आले नाही व वरील अवास्तव रक्कमेवर व्याज व दंड लावुन पुढील महीण्याची वीज देयके देण्यात आली. ग्राहकाने मंचाकडे तक्रार दाखल करुन वरील अवास्तव वीज बिल दुरुस्ती करण्याबाबत व व्याज दंडाची रक्कम रद्द करण्याबाबत तसेच झालेल्या मानसिक त्रासापोटी नुकसान भरपाई मीळण्याबाबत विनंती केली.

२) दिनांक २९/१२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी श्री पी.आर.तौर व वस्तीगृह अधिक्षक श्री अभिजीत जोशी उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी केसबाबात माहीती संबंधित उपविभाकडुन उपलब्ध न झाल्यामुळे सुनावणीची पुढील तारीख देण्याची विनंती मंचास केली.त्यामुळे पुढील सुनावणी ०५/०१/२०१० रोजी ठेवण्यात आली.

३) दिनांक ०५/०१/२०१० रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी व ग्राहक प्रतिनिधी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी यांचे लेखी निवेदनात मान्य केले की, माहे डिसेबर २००७ ते सप्टेबर २००९ या २२ महीण्याच्या कालावधीत ग्राहकाचे मीटर रिडींग चुकीचे घेण्यात आले. त्यामुळे सप्टेबर २००९ मध्ये प्रत्यक्ष मीटर वाचणानुसार ग्राहकास बिल देण्यात आले.ग्राहकाच्या तक्रारीनुसार वरील देयक २२ महीण्याच्या कालावधीत विभागुन देवुन माहे नोव्हेबर २००९ अखेर ग्राहकाकडे ८८९८०/- रुपये प्रलंबित असल्याचे सांगीतले. वीज ग्राहकाने, महावितरण कंपनीची २२ महीण्यापर्यत चुकीचे मीटर रिडींग घेणे ही कृती त्यांच्या सेवेमध्ये त्रुटी निर्माण करणारी असुन वरील अवास्तव वीज देयक अमान्य असल्याचे सांगीतले. नोडल अधिकारी यांनी सादर केलेल्या जबाबावर उत्तर देण्याकरीता ग्राहकाने १५ दिवसांची मुदत देण्याची विनंती मंचास केली. सुनावणीची पुढील तारीख दिनांक १९/०१/२०१० रोजी ठेवण्यात आली.

४) दिनांक १९/०१/२०१० रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी व ग्राहक प्रतिनिधी उपस्थित होते.ग्राहकाने लेखी निवेदन सादर करुन सांगीतले की,त्यांची संस्था ही सेवाभावी संस्था म्हणुन मा.धर्मदाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी झालेली आहे. त्यामुळे महावितरण कंपनीने एकत्रीतपणे एकामहीण्याचे दिलेले देयक रुपये ८८९८०/- ते भरु शकत नाहीत व त्यामुळे वर्षाच्या सेवटी होणा-या लेखा परीक्षणाच्या अक्षेपास उत्तर देणे ही एक नवीन समस्या निर्माण होईल. महावितरण कंपनीने वेळेच्यावेळी रिडींग घेवुन योग्य वीज बिल दिलेले नाही त्यामुळे आता दिलेले एकत्रीत व अवास्तव वीज बिल भरण्यास ग्राहक जबाबदार नाही. नोडल अधिकारी यांनी ग्राहकाचा स्थळ निरिक्षण अहवाल तसेच सुधारीत वीज बिल प्रस्ताव मंचास सादर केला. दोन्ही बाजुचे म्हणणे एकुन घेतलल्यानंतर प्रकरण निकासाठी ठेवण्यात आले.

५) दोन्ही बाजुकडुन दाखल झालेल्या कागदपत्रावरुन असे दिसुन येते की, ग्राहकाचे माहे डिसेंबर २००७ ते सप्टेबर २००९ या २२ महीण्याच्या कालावधीत चुकीचे मीटर रिडींग घेण्यात आले व माहे सप्टेबर २००९ मध्ये

एकत्रीत रिडींग घेवुन ग्राहकास ११०९१ युनिटचे रुपये ८८९९२.१९/- चे देयक देण्यात आले. वरील कनेक्शन चा वीज वापर हा मतीमंद मुलांचे वस्तीगृहा करीता होत असुन वरील संस्था ही एक धर्मदाय संस्था आहे. ग्राहकाने नविन कनेक्शन घेतल्यापासुन त्यांना चुकीचे रिडींग दाखवुन दरमहा १०० ते २०० युनिटची आकारणी केल्याचे दिसुन येते. ग्राहकाने त्यांना देण्यात आलेले देयक प्रत्येक महीण्यात भरलेले आहे. ग्राहकाच्या विनंती नुसार मंचाने त्यांचे मीटर व ते वापरत असलेला वीज भार यांची पाहणी करण्याकरीता दिनांक ०५/०१/२०१० रोजी नोडल अधिकारी व संबंधित कनिष्ठ अभियंता चिकलठाणा यांच्या उपस्थितीत स्थळ निरिक्षण केले. त्यावेळी ग्राहकाचे मीटर योग्य गतीने फिरत असुन तो वरील मीटरद्वारे ३.५० कि.वॅट वीजभार वापरत असल्याचे आढळुन आले. ग्राहकाच्या मीटरचे रिडींग दिनांक ०५/०१/२०१० रोजी १८४५३ युनिट असल्याचे आढळुन आले त्यामुळे वीज पुरवठा घेतल्याच्या तारखेपासुन म्हणजे दिनांक १२/०९/२००७ ते ०५/०१/२०१० या २८ महीण्याच्या कालावधीत १८४५३ युनिट वीज वापर दिसुन येतो म्हणजेच ग्राहकाचा सरासरी वीज वापर (१८४५३÷२८)=६५९ युनिट प्रति माह झाल्याचे दिसुन येते.जो तो वापरत असलेल्या वीजभारानुसार योग्य आहे.

६) महावितरण कंपनीने २२ महीण्यापर्यंत ग्राहकाच्या मीटरचे चुकीचे रिडींग घेवुन व त्यानुसार वीज देयक दिले त्यामुळे ग्राहकाचे मीटर योग्य असुनही त्याचे चुकीचे रिडिंग घेतल्यामुळे वापरलेले युनिट मीटरमध्ये साठवुन राहीले. व त्याचे एकत्रीत देयक सप्टेबर २००९ मध्ये ग्राहकास देण्यात आले. महावितरणची वरील कृती निश्चीतपणे ग्राहकांच्या सेवेमध्ये त्रुटी निर्माण करणारी आहे.त्यामुळे झालेल्या अर्थिक व मानसिक त्रासापोटी नुकसान भरपाई मीळण्यास ग्राहक पात्र आहे असे मंचाचे मत आहे.

७) नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या सुधारीत वीज बिल प्रस्तावानुसार ग्राहकास माहे सप्टेबर २००९ अखेर १२१००/-रुपये क्रेडीट दाखविण्यात आले आहे. सी.पी.एल. नुसार माहे सप्टेबर २००९ ची थकबाकी रुपये ८९३७८.९७/- आहे.त्यामुळे माहे सप्टेबर २००९ आखेर सुधारीत वीज देयक (८९३७८.९७ - १२१००)=७७२७८.९७/- रुपये होईल.

# आदेश

१) महावितरण कंपनीने माहे सप्टेबर२००९ अखेर ग्राहकास दिलेले रुपये ८९३७८.९७/- चे वीज देयक रद्द करण्यात येत असुन त्याऐवजी ग्राहकास ७७२७८.९७/-चे सुधारीत वीज देयक द्यावे.

२) ग्राहकास झालेल्या आर्थीक व मानसीक त्रासापोटी नुकसान भरपाई म्हणुन रुपये २०००/- देण्यात यावे व त्याची वजावट वरील देय वीज बिलातुन करावी.

३) ग्राहकाने विनंती केल्यास वरील वीज देयक तीन समान हप्तामध्ये भरण्याची सवलत देण्यात यावी व त्यामध्ये कोणतेही व्याज दंडाची आकारणी करु नये.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| **प्र. अ. सगणे** | **विलासचंद्र सु. काबरा** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य/सचिव** | **सदस्य** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.**

क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२६७/२००९/१०१/ दिनांक :-

प्रति,

नवजीवन सोसायटी फॉर रिहॅबिलीटेशन,
ऑफ मेंटली रिटारडेड,
पी-६५,एम.आय.डी.सी. एरिया,
चिकलठाणा, नारेगांव रोड, औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००१२३४०६६१)

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/**२६७/२००९/१०१**)

आपण दिनांक १५/१२/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रती,सविनय सादर,
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.